## नियमित दिवाणी दावा क्र.१९०/२०१४ मधील निशाण क्र.१८६ खालील आदेश

[ CNR No.MHKO090002992014 ]

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मुदत मिळण्याकरिता सादर केलेला आहे. मागील बऱ्याच तारखांना वादी यांना स्पष्टपणे लेखी व तोंडी ताकीद देण्यात आली की, प्रकरण जुने असलेने कसल्याही परिस्थितीत तहकुबी मिळणार नाही. तरीही आजरोजी वादीमार्फत प्रस्तुतच्या प्रकरणात तहकुबीचा अर्ज सादर करणेत आला. आजरोजी वादी यांचे नवीन विधीज्ञ हजर नसलेने तहकुबी देणेत यावी, याबद्दल वादी यांनी कथन केले व पुढील तारखेस कुठल्याही प्रकारे तहकुबी मागणार नाही, असे सांगितले. सबब वादी यांनी दिलेल्या हमीप्रमाणे शेवटची संधी म्हणून तहकुबी देणेत येत आहे. पुढील तारखेस वादी यांनी युक्तिवाद न केलेस त्यांचा युक्तिवाद सादर करणेचा अधिकार काढून घेणेत येईल व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकून प्रस्तुतचे प्रकरणात न्यायनिर्णय देणेत येईल. सदरील आदेशाची समज वादी यांना देणेत आली.

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.09.12 11:29:59 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : ११.०९.२०२५.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज